दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार दि.१० एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २३७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# बेरोजगारांना काम, शेतकयांच्या उसाला योग्य भाव देणे हीच माझी लायकी

## शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांचा पलटवार



**वादळवार्ता/बीड**

मी एका सामान्य, गरीब कुटुंबातील शेतकरी पुत्र आहे. सामान्य जनता माझ्या सोबत असल्याने विरोधक माझी लायकी काय ? अशी माझ्यावर व्यक्तिशः टीका करीत आहेत. मात्र शेतकऱ्यांनी रक्ताचे पाणी करून पिकविलेल्या उसाला मराठवाड्यात सर्वात जास्त भाव देत बेकार तरुणांच्या हाताला काम देणे ही माझी लायकी आहे. असा पलटवार राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केला आहे.

बीड लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांनी भेटीगाठीवर भर दिला आहे. मतदार जनतेकडून त्यांचे गावोगावी स्वागत होत असून सामान्य जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ते पाहून विरोधकांकडून वैयक्तिक टीका केली जात असून त्यांची लायकी काढत केलेल्या टिकेवर बजरंग सोनवणे यांनी पलटवार करीत उत्तर दिले. त्यांनी टिकेला उत्तर देताना सांगितले की, येडेश्वरी साखर कारखान्याच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून दिला. त्यातून तरुण स्वतःच्या पायावर उभी राहिली. सामान्य कुटुंबाची चूल पेटविणे ही माझी लायकी आहे. तर आपल्या कारखान्यात परिसरात शेतकऱ्यांनी पिकविलेल्या रक्ताचे पाणी करून पिकविलेल्या उसाला मराठवाड्यातील साखर कारखान्याच्या तुलनेत या शेतकऱ्याच्या पोराने सर्वाधिक भाव दिला ही आपली लायकी असल्याचे सांगून ज्यांना आपल्या पित्याने कष्टाने उभा केलेला साखर कारखाना नीट चालविता आला नाही. ज्यांनी शेतकरी व कामगारांच्या चुलीत पाणी टाकण्याचे काम केले. त्यांनी स्वतःची लायकी काय हे तपासावे. असा उलट सवाल ही शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांनी केला आहे.

## सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस द्वारे सक्षम केलेले सामान्यतः वापरले जाणारे खढठ फाईल करण्याची कार्यक्षमता

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/ पंकज भंडारी**

सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस (CBDT) ने करदात्यांना 1 एप्रिल 2024 पासून मूल्यांकन वर्ष 2024-25 (आर्थिक वर्ष 2023-24 शी संबंधित) साठी त्यांचे आयकर रिटर्न (ITR) भरण्याची सुविधा दिली आहे. आयटीआर अर्थात ITR-1, ITR-2 आणि ITR-4, सामान्यतः करदात्यांनी वापरलेले ई-फायलिंग पोर्टलवर 1 एप्रिल 2024 पासून करदात्यांना त्यांचे रिटर्न भरण्यासाठी उपलब्ध आहेत. 1 एप्रिलपासून कंपन्या ITR-6 द्वारे त्यांचे ITR दाखल करू शकतील. याची पूर्वसूचना म्हणून, सीबीडीटीने आयटीआर फॉर्म लवकर अधिसूचित केले होते, आयटीआर 1 आणि 4 ने सुरुवात केली होती जी 22 डिसेंबर 2023 रोजी अधिसूचित करण्यात आली होती, आयटीआर-6 24 जानेवारी 2024 रोजी अधिसूचित करण्यात आली होती आणि 31 जानेवारी 2024 रोजी आयटीआर-2 अधिसूचित करण्यात आली होती. . ई-रिटर्न मध्यस्थांच्या (ERI) सोयीसाठी, ITR-1, ITR-2, ITR-4 आणि ITR-6 साठी JSON स्कीमा आणि A.Y साठी कर लेखापरीक्षण अहवालांची योजना देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. 2024-25. ई-फायलिंग पोर्टलच्या डाउनलोड विभागांतर्गत ते केले जाऊ शकते. अशा प्रकारे, करदात्यांना साठी ITR-1, ITR-2, ITR-4 आणि ITR-6 दाखल करण्यास सक्षम केले आहे. 01.04.2024 पासून ई-फायलिंग पोर्टलवर 2024-2025. खरं तर, A.Y. साठी सुमारे 23,000 ITR 2024-25 आधीच दाखल केले आहेत. ITR 3, 5 आणि 7 दाखल करण्याची सुविधा लवकरच उपलब्ध करून दिली जाईल. अलीकडच्या काळात पहिल्यांदाच आयकर विभागाने करदात्यांना नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्या दिवशी रिटर्न भरण्यास सक्षम केले आहे. अनुपालन सुलभता आणि अखंड करदात्या सेवांच्या दिशेने हे आणखी एक मोठे पाऊल आहे. असे मत सीए हार्दीक संघवी पुणे यांनी व्यक्त केले.

## देशाचे गृहमंत्री अमित शाह यांची नरसी येथे सभेचे आयोजन



**वादळवार्ता/नरसी**

दिनांक ११/०४/२०२४ रोजी नरसी येथे होणार आहे. त्या निमित्त सभास्थळाची पाहणी करण्यासाठी गिरीष महाजन यांनी भेट दिली व तसेच नरसी येथे पालकमंत्री गिरीष महाजन यांनी श्रावण पाटील भिलवंडे यांच्या निवासस्थानी भेट दिली या वेळी सोबत लोकसभा उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार राजेश पवार, शिवराज पाटील होटाळकर, लक्ष्मण ठाकरावाड,बालाजी बचेवार, अशोक पाटील मुगावकर,मनोहर पवार, राजेंद्र रेड्डी, अनिल पाटील खानापूरकर आदी मानेवर उपस्थित होते

## जेएनपीटी च्या कामगार नेत्यांची निर्दोष मुक्तता.




**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

जेएनपीटी वर्कर्स युनियन तर्फे कामगारांच्या विविध मागण्या संदर्भात प्रशासनाच्या विरोधात दिनांक ०७ जानेवारी २०२२ रोजी लाक्षणिक उपोषण केले होते. त्या संदर्भात युनियनच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. त्या गुन्ह्यांमधून मा. न्यायालय उरण यांनी रविंद्र पाटील, सुरेश पाटील, बी के ठाकूर, प्रकाश नाचरे, जे के भोईर आणि मंगेश ठाकूर या सर्व जणांची दिनांक ०६.०४.२०२४ रोजी निर्दोष मुक्तता केली आहे. युनियनच्या वतीने प्रशासानासोबत वेळोवेळी बैठका घेऊन कामगारांच्या भ वि त व्या सं द र्भा त प्रशासनाने लेखी करार करावा, मयत कामगारांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यात यावे, तसेच निवृत्त कामगारांच्या वारसांना वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी हे आंदोलन करीत होतो, परंतु, प्रशासन दाद देत नव्हती त्याच्या निषेधार्थ दिनांक ०७.०२.२०२२ रोजी लाक्षणिक उपोषण केले होते.याचाच मनात राग धरून प्रशासनाने कामगार नेत्यांवर गुन्हे दाखल केले होते. दिनांक ०६.०४.२०२४ रोजी मा. न्यायालय उरण यांनी रविंद्र पाटील, सुरेश पाटील, बी के ठाकूर, प्रकाश नाचरे, जे के भोईर आणि मंगेश ठाकूर या सर्व पदाधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता केली आहे. संघटनेच्या वतीने ॲडव्होकेट रत्नदीप पाटील, अमर पाटील यांनी न्यायालयात भक्कमपणे कामगारांची बाजू मांडली. विशेष म्हणजे यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क, फी न घेता निःशुल्क पणे बाजू मांडली.

## एसटी कर्मचा-यांना शुद्ध गारेगार पाणी उपलब्ध होणार

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे/ पंकज भंडारी**



एसटी कर्मचाऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी एसटी महामंडळाच्या विविध विभागीय कार्यालयाने इनबिल्ट वॉटर कुलर व प्युरिफायरची कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनाशुद्ध गारेगार पाणी उपलब्ध होणार आहेएका खाजगी कंपनीकडून इनबिल्ट वॉटर कुलर व प्युरिफायरचा खरेदी करण्यात येणार आहेत. इनबिल्ट वॉटर कुलर व प्युरिफायर स्थापितीकरणाची ठिकाणे व पत्ता हा विभागांमार्फत मागविण्यात आला होता, सर्व विभागांमार्फत वॉटर कुलरच्या स्था पि ती क र णा वि ष यी ची ठिकाणे ही प्राप्त झाली पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.मशिन स्थापितीकरण करण्यासाठी संबंधित अधिकारी म्हणजेच आगार व्यवस्थापक, विभाग नियंत्रक, यंत्र अभियंता (चा) यांनी जागा निश्चित करणे आवश्यक आहे.ही मशिन प्राधान्याने चालक वाहक व यांत्रिकी कर्मचारी यांच्या विश्रांतीगृहात स्थापित केली जाणार आहे. या कामासाठी आवश्यक खर्च करण्याचे अधिकार विभाग नियंत्रक यांना असून त्यांनी त्यांच्या अधिकारात सदरचा खर्च केला जाणार आहे.

## श्री वाघेश्वर देवाच्या चित्रिकरण गीताचे दिमाखदार उद्घाटन.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील पिरकोन गावचे जागृत ग्रामदैवत आणि परिसरातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान, हाकेला धावणाऱ्या श्री वाघेश्वर देवाच्या किर्तीचा महिमा रायगडभूषण किशोर दत्ताराम पाटील लेखक, दिग्दर्शक, कवी यांनी आपल्या स्वलिखित व स्वगायनाने सादरीकरण केलेल्या “घुंगूर बांधून काठीला वाघेश्वर देवानं” या गीतात मांडला असून या गिताच्या चित्रिकरणाचे उद्घाटन नुकतेच श्री वाघेश्वर मंदिराच्या सभागृहात जीवन गावंड माजी जि.प. सदस्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सदर गीताचे गीतकार व गायक रायगडभूषण किशोर पाटील यांचे कौतुक



सर्वच मान्यवरांनी आपल्या मनोगतात मांडून चित्रिकरणास शुभेच्छा दिल्या.

सदर प्रसंगी शिवशंकर नाट्य मंडळाचे संस्थापक शेखर पाटील, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ उरणचे अध्यक्ष हेमंत गावंड, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ उरणचे अध्यक्ष महेंद्र गावंड, कोरिओग्राफर अमृत म्हात्रे, शिवशंकर नाट्य मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र गावंड,उपाध्यक्ष विठ्ठल गावंड, आम्ही पिरकोनकर समुहाचे अध्यक्ष आणि दुर्ग मावळा प्रतिष्ठानचे सचिव चेतन गावंड, श्री वाघेश्वर देवस्थान आळीचे अध्यक्ष विशाल गावंड, सामाजिक कार्यकर्ते छगन गावंड, यशवंत पाटील, विनायक गावंड, नाट्यकलाकार एकनाथ म्हात्रे, गोपाळ म्हात्रे, विष्णू पाटील, नाट्य अभिनेत्री जोत्स्ना पाटील, मंडळाचे हितचिंतक, महिलावर्ग व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विलास गावंड यांनी केले.उपस्थितांचे आभार महेंद्र गावंड यांनी मानले.

संपादकीय

## मांगल्या प्रतीक-गुढीपाढवा

गुढीपाडव्याच्या व मराठी नववर्षाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा ९ एप्रिल २०२४ रोजी मंगळवारला गुढीपाडवा हा सण आलेला आहे. हिंदू कॅलेंडरनुसार, चैत्र नवरात्री ची सुरुवात गुढी पाडव्याच्या दिवसापासून होते. हिंदू नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढीपाडवा होय. हा सण चैत्र शुद्ध प्रतिपदेला साजरा केला जातो. हा सण प्रामुख्याने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करतात. मराठी नववर्षाचा पहिला दिवस अतिशय पवित्र मानला जातो. मराठी नव वर्षाचे स्वागत करण्यासाठी घराच्या दारासमोर गुढी उभारली जाते. पण खरं तर आज ह्या संस्कृतीचा, ह्या सणाचा विसर पडत चाललेला आहे. या धकाधकीच्या जीवनामध्ये हिंदू सण कमी प्रमाणात साजरी केली जातात. त्यासाठी आपल्या येणाऱ्या भावी पिढीला या संस्कृतीची, या सणाची जाणीव व माहिती करून दिली पाहिजे. जेणेकरून आपल्या पवित्र आणि महान हिंदु संस्कृतीचे महात्म्य त्यांनाही पटले पाहिजे.

आपण गुढीपाडव्याचा सण का साजरा करतो. खर तर चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच चैत्र महिन्याचा पहिला दिवस होय. या दिवशी हिंदु चे नव वर्ष सुरू होते. आणि नववर्षाचे प्रत्येक धर्माचे लोक ज्या प्रमाणे स्वागत करतात त्याच प्रमाणे प्रकारे हिंदू धर्मीय स्वागत करतात. आणि हीच स्वागत करण्याची पद्धत म्हणजे गुढीपाडवा होय. गुढीपाडव्याला नक्की काय केले जाते, हे आपण जाणून घेऊया. या दिवशी प्रत्येक जण घरोघरी आपल्या दारात एक उंच काठी रोवतात या काठीला गुढी असे म्हणतात. हिंदू धर्म शास्त्र अस मानतो की, गुढी हे विजयाचे प्रतीक आहे. समृद्धीचे प्रतीक आहे. ज्या घरासमोर गुढी उभारली असेल, त्या घरातील लोकांना विजय मिळतो. अनेक गोटीवर राग असेल, क्रोध असेल किंवा असुय्या असेल या दूर्गुणावर आपण विजय मिळवायचा असतो. हे विजयाचे प्रतीक आहे. आपण हे जे काम करतो, कष्ट करतो त्यामुळे' घरामध्ये सुख समृद्धी यावे यासाठीचे प्रतीक म्हणजे ही ग, वेदांग ज्योतिष नावाचा ग्रंथ आहे. या ग्रंथानुसार संपूर्ण वर्षभरात साडेतीन शुभ मुहूर्त असतात. या साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक . हा गुढीपाडवा मानला जाते.आणि म्हणूनच लोक या दिवशी नवीन प्रकारचे वस्तू खरेदी करतात. आणि शुभ कार्याला याच दिवशी सुरुवात करतात. आपल्याला माहीतच आहे प्रभू रामचंद्रांना चौदा वर्षाचा वनवास भोगावा लागला. ते प्रत्यक्षात देव असून सुद्धा प्रभू रामचंद्राने लोकांमध्ये एक आदर्श निर्माण व्हावा, येणाऱ्या पिढ्यांना आदर्श कसे असावे ,आदर्श वर्तन कसे असावे याचे मूर्तिमंत उदाहरण कसे असावे.यासाठी प्रभू रामचंद्रानी आपला भाऊ लक्ष्मण आणि पत्नी माता सीता यांच्यासोबत १४ वर्ष वनवास भोगले. आणि त्या काळामध्ये लंकापती रावण होता. तो अतिशय दुष्ट होता. त्यांचा वध केला. अनेक राक्षसांचा पराभव केला. आणि १४ वर्षाचा वनवास भोगून जेव्हा प्रभू रामचंद्र अयोध्या नगरीत परतले तेव्हा तेथील जनतेने मोठ्या उत्साहाने प्रभू रामचंद्राचे स्वागत केले. त्यावेळी प्रत्येक घरोघरी गुढ्या उभारल्या होत्या. अंगणात रांगोळ्या घालून आयोध्या नगरी सजविण्यात आली होती. म्हणूनच म्हटले जाते की गुढी ही विजयाचे प्रतीक आहे. प्रभू रामचंद्रांनी सर्व संकटावर मात करून विजय मिळविला. त्याचे हे प्रतिक म्हणजे गुढी होय.

एकेकाळी भारतात 'शक' होते. 'शक' हे अत्यंत दुष्ट होते. या शकानी उत्पात माजविला होता. याचा पराभव करण्यासाठी शालिवाहन नावाच्या कुंभाराच्या मुलाने तब्बल सहा हजार मातीचे सैनिकांचे पुतळे बनविले. आणि त्यामध्ये प्राण निर्माण करून त्या सैनिकांच्या साह्याने या शकाचा पराभव केला. तर तो जो काही विजय मिळविला या विजयाच्या पित्यार्थ ही गुढी उभारली जाते. शालीवाहनाच्या शौर्याचा पराक्रमाचा विजय दिवस म्हणजे चैत्र पाडवा गुढीपाडवा होय. या दिवसापासून शालिवाहन शके वर्षाची सुरुवात झाली आहे. हा भारतीय संस्कृती व नितीमुल्ये या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा सण म्हणून साजरा करतात.गुढीला वेगवेगळ्या भाषेत वेगवेगळे नाव आहेत.

आजचे युग हे विज्ञान युग आहे. आपण जर पाहिले तर गुढीपाडव्याच्या दिवशी कडुलिंबाचे पान वाटतो त्यामध्ये थोडासा गुड, हिंग,मिरी,ओवा, मीठ टाकले जातात. वैज्ञानिक दृष्ट्या हे पाहिले तर हे सगळे मिश्रण आपण खातो तेव्हा आपल्या शरीरातील उष्णता कमी होत असते.

# नंदुरबार जिल्ह्यासह संपूर्ण मतदार संघात शेतकरी उत्पन्न दुप्पट करून महिला सक्षमीकरण करणार-खा.हिना गावित

**दैनिक वादळ वार्ता**
**बोरद/प्रशांत सूर्यवंशी**

येणाऱ्या पाच वर्षात नंदुरबार जिल्ह्यासह माझ्या संपूर्ण मतदार संघातील शेतजमीन ही सिंचनाखाली आणेल व येथील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करेन तसेच महिला सक्षमीकरणासाठी संपूर्ण कार्य करेल असा विश्वास खासदार हिना गावित यांनी तळोदा येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परीसंवादात व्यक्त केला.

तळोदा येथे जिल्ह्याचे पालकमंत्री विजयकुमार गावित व खा.हिना गावित यांनी धावती भेट दिली .या भेटीत त्यांनी पत्रकारांशी परिसंवाद केला. त्यात विजयकुमार गावित यांनी नंदुरबार जिल्ह्याचा विकासासाठी प्रयत्न सुरू असून संपूर्ण जिल्ह्यासाठी १२०० कोटींचा विकास आराखडा तयार आहे.प्रत्येक पाडापर्यंत वीज पोहचवून येणाऱ्या आगामी काळात विजेची समस्या निकाली लावणार आहेत.तसेच तापी नदीच्या पात्रातून दक्षिणेकडे आठ लिफ्ट व उत्तरेकडे ८ लिफ्ट लावून संपूर्ण जिल्ह्याची शेतजमीन सिंचनाखाली आणून जिल्हा कृषी समृद्ध करण्यावर भर देणार आहे तसेच आश्रमशाळेत कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था करून गुरुकुल



शिक्षण पद्धती अमलात आणणार आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

खा.हिना गावित यांनी मागील दहा वर्षात केलेल्या विकास कामांचा पाढा वाचवून दाखविला. सर्वप्रथम त्यांनी मागील दहा वर्षात केलेल्या कार्याचा उल्लेख करताना शेवाळी - नेत्रंग महामार्ग व बऱ्हाणपूर -अंकलेश्वर महामार्ग याना राष्ट्रीय महामार्ग म्हणून मान्यता मिळवली.त्यात शेवाळी नेत्रांग राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगती पथावर आहे तसेच बऱ्हाणपूर अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्गाचे सर्व्हे झाला असून लवकरच कामाला सुरवात होणार आहे.धुळे - बडोदा या नवीन महामार्गासाठी निधी मंजूर केला असून लवकरच कामाला सुरवात होणार आहे.

सुरत-भुसावळ या रेल्वे लाईनच्या दुपदरीकरणाचा देखील त्यांना उल्लेख केला.तर नंदुरबार मुंबई ही रेल्वे सेवा सुरू करून दळणवळणाची समस्या दूर केली. केंद्र सरकारकडे नंदुरबार- पुणे रेल्वेची मागणी केली असून लवकरच तो प्रश्न देखील मार्गी लागणार आहे. नंदुरबार -शहादा रेल्वेसाठी देखील त्या प्रयत्नशील आहेत.केंद्र सरकारच्या अमृत स्टेशन योजनेअंतर्गत ११ कोटी निधी मंजूर झाला असून त्यात अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.तसेच शेतकऱ्यांच्या मालाची वाहतूक करण्यासाठी रेल्वेची रॅक सुविधा २०१९ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच त्यांच्या आयुष्यातील सर्वात आव्हानात्मक काम म्हणजे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणे. याची देखील त्यांनी केंद्र सरकार कडे मागनी लावून धरली होती.अनेक संकटावर मात करून शेवटी २०१९ साली वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले आणि यावर्षी पहिल्या बॅचचे विद्यार्थी हे आपली पदवीचे शिक्षण पूर्ण करून सार्वजनिक जीवनात सेवा प्रदान करणार आहेत. मागील दहा वर्षात जवळपास आरोग्याचा सोयीसुविधांचा प्रश्न निकाली काढण्यात त्यांना यश आले आहे.लवकरच आयुष रुग्णालय व एम्सच्या धर्तीवर जिल्हा वासीयांसाठी अत्याधुनिक सोयीसुविधा युक्त महिला रुग्णालय स्थापन करण्यात येणार असून त्यात एकाचवेळी अकरा महिलांची प्रसूती होऊ शकते अशी सुविधा करण्यात येणार आहे.आगामी काळात महिलांसाठी अनेक योजना राबवून महिला सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार असे मत त्यांनी व्यक्त केले.सदर पत्रकार परिसंवादात माजी नगराध्यक्ष अजय परदेशी, रुपसिंग पाडवी,गौरव वाणी ,श्याम राजपूत, कैलास चौधरी व अमोल भारती उपस्थित होते.

# लिंगपिसाट मुख्याध्यापकाने बारा वर्षीय विद्यार्थिनीची काढली छेड..

## संतप्त पालकांनी दिला चोप..गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**संभाजीनगर/प्रा संजय तुपे**

जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापकाने विद्यार्थिनी सोबत केले गैरवर्तन या प्रकारामुळे विद्यार्थिनी घाबरून गेली व पुढील अनर्थ टळला विद्यार्थिनीने दुपारपर्यंत कसाबसा वेळ काढून घेतला आपले घर गाठले व घडलेला प्रकार आपल्या मावशीला सांगितला संतप्त झालेल्या पालकांनी मुख्याध्यापकाला दिला चोप, सदरची घटना ही दिनांक ५ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास घडली मावशीने ताबडतोब शाळा काढली व मुख्याध्यापक दिसताच त्याला जाब विचारला त्याने उडवाउडविची उत्तरे देऊन निघून जाण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत जमलेल्या पालकांना हा प्रकार समजतात सर्वांनी मिळून या मुख्याध्यापकाला चोप दिला आणि चोप देतच जवाहर नगर पोलीस ठाण्यात आणले पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली शेख अब्दुल खालील (वय ५३) आशिशा मंजिल चेलीपुरा असे संशयित मुख्याध्यापकाचे नाव आहे, पीडित बारा वर्षीय मुलीची आई बी एस एफ मध्ये जवान आहे ती देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावत असल्याने मुलीचा सांभाळ करण्याची जबाबदारी तिने बहिणीकडे सोपविले आहे लहानपणापासून मावशीच या मुलीचा संभाळ करत आली आहे तिला जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकले आहे मुलगी नेहमीप्रमाणे दिनांक पाच एप्रिल सकाळी शाळेत गेली सकाळी नऊ वाजता ती शाळेतल्या बाथरूम मध्ये गेली तिच्यावर नजर ठेवून असलेला मुख्याध्यापक खालील हा ती बाहेर येईपर्यंत बाथरूम मध्ये थांबला ती बाहेर येतात त्याने बाथरूमच्या बाजूलाच असलेल्या वर्गात भरून घेतले ती वर्गात येतात दरवाजा आतून बंद केला तिला वेगवेगळ्या अश्लील प्रश्न केले त्यामुळे ती घाबरून गेली त्याने तिच्यासोबत असलेली चाळे सुरू करतात मुलीने ओढण्यास सुरुवात केली तिच्या जोर जोरात ओरडल्यामुळे घाबरलेल्या खालीलने



तिला सोडून दिले मुलीने लगेच तिथून पळ काढत तिचा वर्ग काढला दुपारपर्यंत वर्गातच थांबून शाळा सुटताच तिने घर गाठले त्यामुळे गेलेल्या मावशीला कॉल करून तो प्लीज लवकर घरी ये असे तिने सांगितले मुलगी रडत असल्याने मावशी नेतात तडीने घर गाठले त्यानंतर मुलीने शाळेत घडलेला प्रकार तिला सांगितला हे एकूण संतप्त झालेल्या मावशीने तात्काळ शाळा काढली खालील शाळेतच होता त्याला मावशीने जाब विचारल्यावर तोडा ओळीचे उत्तरे देऊ लागला त्याने तेथून निघून जाण्याचा प्रयत्न करतात मावशी आणि तिथे जमलेल्या पालकांनी त्याला पकडत बेदम चोप दिला चोप देतच जवाहर नगर पोलीस ठाण्यात आणले पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज बंडकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत यांना तपासाचे आदेश दिले राऊत यांनी महिला समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत मुलीचा जबाब नोंदविला या प्रकरणात गुन्हा दाखल करून शेख अब्दुल खलील ला अटक करण्यात आले एम एससी बीएड शिकलेल्या खालील विवाहित असून त्याला दोन मुले असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले शिक्षकी पेशास काळीमा फासणाऱ्या मुख्याध्यापका विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला असून या लिंग पिसाट शिक्षकाला चूक दिल्याने इतर चांगल्या शिक्षकाकडे देखील पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असल्याने अशा सडक्या कांद्यामुळे पवित्र समजल्या जाणाऱ्या शिक्षकी पेशा बदनाम होत असून अशा नीतीहीन आणि लिंग पिसाट यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी महिला वर्गातून केली जात आहे

# मार्केट यार्डात विकला जातोय कर्नाटकातील आंबा देवगड,रत्नागिरी हापूस च्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक

दैनिक वादळ वार्ता
पुणे पंकज भंडारी

फळांचा राजा असलेल्या हापूस आंब्यांचा हंगाम सुरू होताच गुलटेकडी मार्केट यार्डात रत्नागिरी आणि देवगड आंब्याच्या नावाखाली कर्नाटकातून येणाऱ्या आंब्याची विक्री केली जात आहे. ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या आडत्यांवर कारवाई करण्याचे आदेश धाब्यावर बसवून फसवणुकीचा गोरखधंदा तेजीत असल्याचे समोर आले आहे. मात्र, बाजार समिती प्रशासनाकडून आडत्यांना पाठिशी घालून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र आहे.

आंब्यांचा हंगाम सुरु होताच बाजारात कोकणातील देवगड, हापूस आंब्यांची आवक मोठ्या प्रमाणात होते. आंब्याच हंगाम सुरु झाल्याने पुण्यातील गुलटेकडी येथील मार्केटयार्ड फळबाजारात मोठ्या प्रमाणात कोकणासह कर्नाटकातून आंबे येत आहेत. याचाच गैरफायदा आडतदार घेत आहेत. ग्राहकांना कोकणातील देवगड, हापूस आंब्याच्या नावाखाली कर्नाटकातून येणाऱ्या आंब्याची विक्री करुन फसवणूक करत आहेत. नागरिकांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी तत्कालीन पणन संचालकांनी परिपत्रक काढत अशा फसवणूक करणाऱ्या आडत्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा आदेश राज्यातील सर्व बाजार समित्यांना दिले. हे आदेश देऊन सुमारे चार वर्षे होत आले. मात्र, मार्केटयार्डमध्ये सर्रास कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेशातील आंब्यांची देवगड, रत्नागिरी हापूसच्या बॉक्समध्ये भरून विक्री केली जात आहे.

## विभाग प्रमुख, गटप्रमुखांचा कानाडोळा

मार्केट यार्डात आंब्याच्या हंगामात प्रत्यक्ष झालेली आवक आणि कागदावर आवक यात मोठी तफावत असते. ग्राहकांची फसवणूक करणारे बहुतांश आडतदार हे परराज्यातील आंबा विक्री करतात.मात्र, आंबा हंगामात आडते आणि विभागप्रमुख, गटप्रमुखांच्या साटेलोट्यामुळे कारवाई केली जात नाही. परिणामी नागरिकांची फसवणूक होते.आडत्यांवर निलंबनाची कारवाई करणार बाजार समितीचे सचिव डॉ.राजाराम धोंडकर म्हणाले, हापूसच्या नावाखाली इतर आंबा विक्री करून फसवणूक करणारया आडत्यांवर पहिल्या टप्प्यात दंडात्मक आणि परवाना निलंबनाच्या कारवाई केली जाईल. त्यानंतर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

# गुढीपाडव्या निमित्त विजयाची भगवा ध्वज उभारून अशोक हिंगे यांनी घेतले नारायण गडाचे आशिर्वाद






**वादळवार्ता/बीड**
वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना पक्षनेते अँड. प्रकाश आंबेडकर यांनी बीड लोकसभेचे उमेदवार तिकीट दिल्यानंतर अशोक हिंगे पाटील यांनी गुढीपाडव्या पासून केली आपल्या संपर्क अभियानाला सुरुवात. आज गुढीपाडव्या निमित्त अशोक हिंगे पाटील यांनी गजानन मार्बल येथील निवासस्थानी विजयाची गुढी उभारून नारायण गडा वर जाऊन त्यांनी दर्शन घेऊन महंत शिवाजी महाराज यांचे आशिर्वाद घेतले नंतर शहेनशहावली दर्ग्यावर चादर अर्पण करुन आशिर्वाद घेतले. स्व.विनायक मेटे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन केले.यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या जिल्ह्यातील नेते पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आज नारायणगड येथून त्यांनी लोकसभेच्या संपर्क अभीयानास सुरुवात केली आहे. २१ एप्रील रोजी ते युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये भव्यशक्ती प्रदर्शन करत आपल्या उमेदवारी अर्ज भरणार आहेत. आजच्या या संपर्क अभियान त्यांच्यासोबत वंचित चे नेते इंजिनियर विष्णू दादा देवकते, डॉ. नितीन सोनवणे, ज्ञानेश्वर कवठेकर, डॉ.छायाताई हिरवे, पुरुषोत्तम वीर, पुष्पा तुरुकमाने,युनूसभाई शेख,बालाजी जगतकर, ए.बी.जौजाळ,अजय सरवदे, किरण वाघमारे,पप्पू गायकवाड,किशोर भोले, लखन जोगदंड, राजेशकुमार जोगदंड,मिलिंद सरपते, संदीप जाधव,रोहन मगर,विक्की डोंगरे,अजय डाके,अनिल डोंगरे,अमित बोबडे,संभाजी हिंगे,आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# अशोक हिंगे पाटील यांच्या उपस्थितीत शिरसदेवी येथे मुस्लिम समाज बांधवांची इफ्तार पार्टी संपन्न



**वादळवार्ता/गेवराई**
वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची शिरसदेवी येथे मुस्लिम समाज बांधवांच्या इफर पार्टीला उपस्थिती होती. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बीड लोकसभेची उमेदवारी मिळाल्याबद्दल सिरसदेवी तालुका गेवराई येथील मुस्लिम बांधवांनी अशोक हिंगे पाटील यांचा शाल, टोपी,हार घालून स्वागत व सत्कार करण्यात आला, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिरस देवी येथील असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.या प्रसंगी वंचितचे नेते विष्णु देवकते,महासचिव ज्ञानेश्वर कवठेकर, पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर,अजय सरवदे,किरण वाघमारे,पप्पू गायकवाड,किशोर भोले, अखिलभाई शेख,अशपाक शेख,अन्वर शेख,अकबर शेख,समिर शेख,शकिल शेख, दादा वक्ते,दिपक खरात,किशोर चव्हाण, कृष्णा शिंदे आदी उपस्थित होते.

## पंधरा वर्षांपासून वर्गणी न मागता विड्यात होते भिम जयंती साजरी

वादळवार्ता/विडा
विडा केज तालुक्यातील विडा येथे मागील पंधरा वर्षांपासून भिम जयंती साजरी केली जाते मात्र बाहेरून एक रुपया देखील वर्गणी न मागता स्वखर्चाने जयंती साजरी केली जाते यात राजकीय नेते पुढारी दुकानदार व्यापारी इत्यादी लोकांना वर्गणी न मागता लाखो रुपये समाज बांधव जमा करून विविध प्रकारचे कार्यक्रम साजरे केले जातात यानिमित्त मंगळवारी संध्याकाळी बैठक घेण्यात आली असून यात ना अध्यक्ष ना सचिव सर्वच एकत्रितपणे येऊन कार्यक्रम साजरा करतात भिम जयंतीचा कार्यक्रम २८ एप्रिल रोजी साजरा होणार असून कोणी बाहेर वर्गणी मागत असेल तर विडा येथे संपर्क करावा असे आव्हान विकास वाघमारे अविनाश ढोबळे ,पप्पू सिरसाट सुरज वाघमारे मनोज ढोबळे रोहित जावळे इत्यादीनी केले आहे.

# सण उत्सवामध्ये ध्वनी प्रदूषण कमी असावे लोकवाद्य वाजवून परंपरा जोपासावी-जिल्हा दंडाधिकारी

## सण उत्सवाच्या माध्यमातून मतदारांमध्ये जागृती करण्याचे आवाहन

**वादळवार्ता/बीड**
या आठवड्यापासून सण उत्सवाला सुरुवात झाली आहे गुढीपाडवा, रमजान ईद , महात्मा ज्योतिबा फुले जयंती, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, महावीर जयंती, हनुमान जयंती, असे सर्व धर्मीय सण उत्सव जिल्ह्यात साजरे होणार आहेत. या सण उत्सवात महापुरुषांचा संदेश तसेच शांतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवावा, नागरिकांना कुठलाही त्रास होणार नाही याची काळजी घेऊन ध्वनी प्रदूषण कमी असावे, त्या ऐवजी लोक वाद्य वाजवून आपली लोकपरंपरा जोपासावी असे आवाहन जिल्हादंडाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज झालेल्या सर्वधर्मीय शांतता बैठकीत केले.
यासह सध्या लोकसभा निवडणुकीचा महामहोत्सव सुरू असून ३९ बीड मतदार संघात १३ मे ला निवडणुका होणार आहेत. साजरा करणाऱ्या सण उत्सवात मतदार जागृती कार्यक्रमही करावा असेही आवाहन आज जिल्हादंडाधिकारी यांनी यावेळी केल्या.
आज नियोजन सभागृहात झालेल्या शांतता बैठकीत जिल्हा दंडाधिकारी यांच्यासह पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर , केजचे उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मीना, माजलगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. धीरज कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई अनिल चोरमुले, उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई नीरज कुमार निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह विविध विभागातील पोलीस निरीक्षक अधिकारी कर्मचारी तसेच शांतता समितीचे सदस्य मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.
या महिन्यात ९ एप्रिलला गुढीपाडवा



११ एप्रिलला रमजान ईद आणि महात्मा ज्योतिबा फुले जयंती, १४ एप्रिलला राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती, १७ एप्रिलला रामनवमी २१ एप्रिलला महावीर जयंती २३ एप्रिलला हनुमान जयंती असे सण उत्सवाचे कार्यक्रम आहेत. या कार्यक्रमांमध्ये नागरिक स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवितात. त्यामुळे या सण उत्सवात ध्वनी प्रदूषण कमी असावे आणि आनंद अधिक असावा यासाठी ध्वनी प्रदूषण कमी करण्याचे आवाहन करून त्याऐवजी लोक वाद्य वाजवावी अशा सूचना जिल्हादंडाधिकारी यांनी यावेळी दिल्या.
महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त १५ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ९३ आणि रामनवमीनिमित्त २६ मिरवणुका जिल्ह्यातून निघणार आहेत. लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे आदर्श आचारसंहिता सुरू असून याचे पालन उत्सव समितीच्या वतीने व्हावे, अशा सूचना जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक श्री ठाकूर यांनी यावेळी केल्या. रमजान ईद निमित्त शहरातील मुख्य ठिकाणी मीना बजार सुरू आहे या ठिकाणी दामिनी पथक तसेच महिला पोलीस पथकाचा बंदोबस्त आहे. अशी माहिती पोलीस अधीक्षक यांनी दिली. रात्रीच्या वेळी पोलीस पेट्रोलिंग सुरू असल्याचीही माहिती त्यांनी यावेळी दिली.
१४ एप्रिलच्या दिवशी निघणाऱ्या मिरवणुकी मध्ये महिलांची अधिक संख्या असते त्यामुळे दरम्यान अनुचित प्रकार न घडावा याकरिता समता सैनिक दलाचे स्वयंसेवक आणि पोलीस यांच्यामध्ये समन्वयक साधून मिरवणूक शांततेत पार पडावी अशाही सूचना पोलीस अधीक्षकांनी यावेळी दिल्या. बीड जिल्ह्यातील आंबेडकरी अनुयायी बीड येथे होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात येत असतात या दिवशी खाजगी वाहनांना रात्री उशिरापर्यंत गाड्या चालवण्याचे परवानगी देण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक श्री ठाकूर यांनी यावेळी सांगितले.
१४ आणि १७ एप्रिलला जिल्ह्यात दारूबंदी शांतता समितीतील सदस्यांकडून १४ एप्रिल डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि रामनवमी निमित्त दारूबंदीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. तो प्रस्ताव मान्य करण्यात आला असून रविवार दिनांक 14 एप्रिल आणि 17 एप्रिल रामनवमी निमित्त जिल्ह्यात दारूबंदी करण्यात आलेली आहे.

# बंकटस्वामी महाराज यांच्या नावाला साजेसे दर्जेदार काम करण्या साठी श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्था कटिबद्ध – श्री मच्छिंद्र घरत.

**वादळवार्ता/बीड**
बीड जिल्ह्याच्या आणि मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठे योगदान श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्थेचे आहे. वारकरी संप्रदायामधील महान संत श्री. बंकटस्वामी महाराजांच्या नावाने ही संस्था स्थापन करण्यात आली. संस्था स्थापनेचा जो उद्देश आहे. तो सर्वसामान्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देणे. त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आनणे. हा उद्देश सार्थ करण्यासाठी आणि श्री. बंकटस्वामी महाराज यांच्या नावाला साजेसे दर्जेदार काम करण्यासाठी सर्व कार्यकारी मंडळ सदैव कटिबद्ध आहे. असे प्रतिपादन संस्था सचिव श्री. मच्छिंद्र अण्णा घरत यांनी केले. बीड येथील श्री. बंकटस्वामी महाविद्यालयात श्री. बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयाचे उद्घाटन ह.भ.प. गंगाभारती हरीहर महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले.



या प्रसंगी श्री. घरत बोलत होते. या कार्यक्रमाला व्यासपीठावर संपादक वैभव स्वामी, ह. भ. प. सुरेश महाराज जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. गणेश पोकळे,माजी प्राचार्य डॉ. बिभीषण भैरट, संस्थेचे सदस्य भाऊसाहेब मुंडे, बद्री शिंदे, सुरेश साबळे, ज्ञानेश्वर घरत, प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री. घरात म्हणाले की, या शिक्षण संस्थेची शिक्षण क्षेत्रामध्ये उज्वल परंपरा आहे. समाजातील तळागाळातील सर्वसामान्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात घेऊन येण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून ही संस्था करत आहे. वारकरी संप्रदायामधील महान संत श्री. बंकटस्वामी महाराज यांच्या नावाने ही संस्था कार्यरत आहे. त्यांच्या नावाला साजेसे कार्य हे कार्यकारी मंडळ आगामी काळात करून संस्थेचा नावलौकिक करेल असेही श्री. घरत म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. गणेश पोकळे यांनी केले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ह.भ.प. सुरेश महाराज जाधव म्हणाले की, वारकरी संप्रदायामधील बंकटस्वामी महाराज चालते बोलते विद्यापीठ होते. भक्तीचा सुर्य बंकटस्वामी महाराज आहेत. संस्थेचा नावलौकिक करण्यासाठी बंकटस्वामी संस्थान परिवार नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाच्या पाठीशी सदैव आहे. आपले मनोगत व्यक्त करताना संपादक वैभव स्वामी म्हणाले, संस्थेच्या पुढील वाटचालीमध्ये पत्रकारिता क्षेत्र म्हणून आम्ही सदैव सोबत राहू. अशा प्रकारच्या शुभेच्छा दिल्या. डॉ. बिभीषण भैरट, प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित कार्यकारी मंडळाचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बप्पासाहेब हावळे यांनी केले. तर शेवटी आभार हाकदार सर यांनी मानले. या कार्यक्रमाला रमेश पाटील, महादेव खोसे, शहाजी कोल्हे, प्रा. प्रमोद जाधव, प्रा. प्रशांत माने, प्रा. वैद्य, श्रीकृष्ण जाधव, प्रशांत कोल्हे, दत्ता जगदाळे सर,सुपेकर सर,खरसाडे सर, सपकाळ सर, लेणे सर कर्मचारी संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामिण भागाचे आरोग्य, आर्थिक, उन्नती, स्वच्छ व सुंदर हरित गाव ही समृद्ध करण्यासाठी रोटरीने पुढाकार घ्यावा

## प्रांतपाल स्वाती हेरकल अंबाजोगाई तालुक्यातील तीन गावांना कंपोस्ट खत निर्मिती संचाचे वाटप




**वादळवार्ता/अंबाजोगाई**

वंचितांना आत्मनिर्भर करण्यासाठी परिवर्तन घडविणारे प्रकल्प राबविले पाहिजेत. या माध्यमातून श्वास्वत विकास झाल्यानंतर ग्रामिण भागाचे आरोग्य, आर्थिक, उन्नती, स्वच्छ व सुंदर हरित गाव ही गाव समृद्ध करणारी योजना राबवून ग्रामिण भागाला आत्मनिर्भर करण्यासाठी रोटरीने पुढाकार घेतला आहे. असे प्रतिपादन रोटरीच्या प्रांतपाल स्वाती हेरकल यांनी केले. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वार्षिक कामाचा आढावा घेण्यासाठी प्रांतपाल स्वाती हेरकल अंबाजोगाईत आल्या होत्या. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर रोटरीचे सहप्रांतपाल गणेश वाघ, रोटरी क्लबचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव गणेश राऊत, रोटरीचे सल्लागार, संतोष मोहिते, भावी अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी यांची उपस्थित होती. यावेळी बोलताना डॉ.स्वाती हेरकल म्हणाल्या की, अंबाजोगाई शहराने रोटरीच्या माध्यमातून आपले अस्थित्व आधुरेखील केले आहे. वंचितांना आत्मनिर्भर करण्यासाठी रोटरीचा मोठा पुढाकार आहे. रोटरीच्या माध्यमातून स्नेह व आत्मियतेने सुरू असलेले काम समाजाला दिशा दर्शक ठरते असे सांगुन त्यांनी विविध प्रकल्पांची माहिती दिली. यावेळी सेंद्रिय शेती करण्यासाठी कंपोस्ट खत निर्मिती संचाचे वाटप जोगाईवाडी , मांडवा व हिवरा येथील ग्रामस्थांना करण्यात आले. तर स्व. बलरामजी परदेशी यांच्या स्मरणार्थ स्वप्नील परदेशी यांच्या वतीने दोन गरजू महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लब व कॉम्प्युटर वर्ल्ड यांच्या वतीने भारज येथील ज्ञानसागर कर्णबधिर विद्यालयाला तीन संगणक संच भेट म्हणून देण्यात आले. यावेळी सामाजिक आधार माणुसकीचे अध्यक्ष ॲड.संतोष पवार व वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे डॉ.इम्रान अली सय्यद यांना रोटरी होकेश्नल अवॉर्ड देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी क्युवर इंडिया या संस्थेस जन्मताच बाळाचे पाय वाकडे असणाऱ्या बालाकांच्या उपचारासाठी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी पॉल हरीस फेलो मानांकणासाठी डॉ.नवनाथ घुगे, डॉ.निशिकांत पाचेगावकर, आनंद कर्नावट, स्वप्नील परदेशी, संतोष मोहिते, कल्याण काळे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्नील परदेशी यांनी केले. संचलन स्वरूपा कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार गणेश राऊत यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिलेटीनचा स्फोट करुन पानटपरी उडवली !

## अंबाजोगाई तालुक्यातील खळबळ जनक घटना; टपरीचालक जखमी



### स्फोटामागे व्यावसायिक कि खाजगी कारण?

टपरीआडून अशोक अवैध धंदे चालवत होता आणि त्यातूनच हा प्रकार झाला असावा अशी ग्रामस्थात चर्चा आहे. मात्र, पोलीस घटनेच्या मुळाशी जाण्यासाठी कसून चौकशी करत असून अशोकचा पूर्वेतिहास देखील तपासला जात आहे. ही घटना खाजगी कारणातूनही झालेली असे शकते अशी शंका पोलीस सूत्रांनी व्यक्त केली आहे

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई - विहिरी खोदण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जिलेटीनचा स्फोट करून चक्क पान टपरी उडवून देण्यात आल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथे सोमवारी (दि.०८) रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घडली. यावेळी चौकात अनेक लोक असतानाही सुदैवाने केवळ टपरीचालक जखमी झाला असून या घटनेमुळे परिसरात एकाच खळबळ उडाली आहे. स्फोटाची माहिती मिळताच जिल्हा पोलीस दलाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून घटनेची कसून चौकशी सुरु केली आहे दरम्यान, सदरील टपरीतून अवैध धंदे सुरु होते आणि त्यातूनच हा प्रकार घडला असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील बसस्थानक नजीक असलेल्या असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये अशोक सुभाष भालेराव याची पान टपरी आहे. अशोक भालेराव हा मुळचा लातूरचा असून मागील १५ वर्षापासून तो जवळगाव येथे वास्तव्यास आहे. अशोकने दिलेल्या फिर्यादीनुसार त्याने नेहमीप्रमाणे सोमवारी दिवसभर व्यवसाय केला. रात्री ८.३० च्या दरम्यान तो पान टपरीत बसला असता टपरी खाली अचानक मोठा स्फोट झाला. या स्फोटाने टपरीखाली असलेले दगड वरचा पत्रा तोडून बाहेर उडाले. सुदैवाने अशोक थोडासा बाजूला बसलेला असल्याने त्याच्या हाताच्या दंडाला घासून हे दगड गेल्याने तो किरकोळ जखमी झाला. या स्फोटात ताप्रीचे अंदाजे २५ हजार रुपयांचे नुकसान झाले. स्फोटाचा आवाज ऐकून चौकात असलेल्या ग्रामस्थांनी टपरीकडे धाव घेतली. स्फोट नेमका कशामुळे झाले हे पहिले असता ग्रामस्थांना टपरीखाली मोठा खड्डा पडलेला दिसून आला. तसेच पानटपरीच्या पाठीमागून एक वायर टपरीच्या बाजूने रोडच्या खाली असलेल्या सिमेंट पाईपमधून धनंजय शिंदे याचे शेतात गेले होते. त्यामुळे कोणीतरी अज्ञात इसमाने टपरीचे पाठीमागून कोणते तरी स्फोटक लावून त्याचे वायर धनजंय शिंदे याचे शेतात नेऊन तिथे वायरला करंट देऊन स्फोट घडवून आणल्याचे अशोकने फिर्यादीत नमूद केले आहे. पोलीस अधीक्षकांची घटनास्थळी भेट दरम्यान, घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी तत्काळ घटनास्थळाला भेट दिली. त्यांच्या सूचनेनुसार पोलीस दलाच्या सर्व तपास यंत्रणा सक्रीय झाल्या आहेत. अंबाजोगाईच्या अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके उपअधीक्षक विजय चोरमले, एलसीबीचे पोलीस निरिक्षक संतोष साबळे यांच्यासह श्वान पथक आणि बॉम्ब शोध पथकाच्या पाहणीनंतर हा स्फोट जिलेटीनचा असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणाचा अधिक तपास बरदापूर पोलीस ठाण्याचे उपनिरिक्षक प्रमोद यादव हे करीत असून हा स्फोट कोणत्या कारणास्तव घडवून आणला हे तपासाअंती निष्पन्न होणार आहे.

# रांगोळयांच्या माध्यमातून मतदान जागृती स्तुत्य उपक्रम-जिल्हादंडाधिकारी



**वादळवार्ता/बीड**

रांगोळी ही भारतीय प्राचीन लोककला असून पांढऱ्या रांगोळीवर विविध रंगभरून सुंदर कलाकृती सादर करणे हा विशेष गुण असून या माध्यमातून मतदान जागृती केली आहे हा एक स्तुत्य उपक्रम असल्याचे जिल्हा दंडाधिकारी दीपा मुधोळ मुंडे म्हणाल्या. ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ आहेत यात स्विपच्या माध्यमातून मतदान जागृती निमित्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. आज बीड शहरातील भाजी मंडई येथील संस्कार विद्यालयाच्या जुन्या इमारतीत स्वीप अंतर्गत रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी जिल्हादंडाधिकारी बोलत होत्या जिल्हादंडाधिकारी पुढे म्हणाल्या, रांगोळी हा कलाप्रकार भारतीयांचा अमूल्य ठेवा असून या अंतर्गत मुलींनी तसेच महिलांनी मतदान जागृतीसाठी याचा उपयोग करून आपल्या कलागुणांची सिद्धता केली आहे. या ठिकाणी एकूण ४३ रांगोळी असून ४३ वेगवेगळ्या पद्धतीने मतदानाचा प्रचार प्रसार करण्याचे मोठे काम या महिलांनी केले असल्याचे भावना यावेळी जिल्हा दंडाधिकारींनी बोलून दाखविल्या.

परीक्षकांनाही परीक्षण करून पहिले तीन रांगोळ्या निवडणे अवघड गेले असेल, इतक्या सुंदर रांगोळी या ठिकाणी असल्याचे त्या म्हणाल्या. प्रत्येकांना पुरस्कार मिळणार नाही परंतु प्रत्येक रांगोळी ही मतदारांमध्ये जागृती नक्कीच पसरवेल असा विश्वास यावेळी जिल्हादंडाअधिकारी यांनी व्यक्त केला. रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक स्नेहा कापसे, द्वितीय क्रमांक विशाखा आगळे , राजश्री नलावडे, तृतीय क्रमांक स्वप्नाली रेंगे आणि श्रावणी गोरे यांनी पटकावला. पुरस्कार स्वरूप जिल्हादंडाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यांप्रसंगी, सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, गट शिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, शालेय पोषण अधीक्षक तुकाराम पवार, डॉ.विक्रम सारुक, विस्तार अधिकारी तुकाराम जाधव,सिद्धेश्वर माटे, श्रीमती प्रणिता गंगाखेडकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ज्ञानेश्वर कोठुळे यांनी केले तर आभार अनिरुद्ध सानप यांनी मानले.

परीक्षकांची जबाबदारी कैलास कलानिकेतन चे श्रीकांत दहिवाळ, बलभीम महाविद्यालयाचे प्राध्यापक केशव भागवत आणि शेषराव क्षिरसागर यांनी पार पाडली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शेख चाचू,ओम ढवळे, यांनी प्रयत्न केले.

# गझल लिहिण्यासाठी आत्मस्फूर्ती, उर्मी, दूरदृष्टी अनदृढता हवीज्येष्ठ गझलकार डॉ. इक्बाल मिन्ने

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अलीकडच्या दशकात अनेक मराठी कवी मराठी गझलेकडे आकृष्ट झालेले दिसतात. आयुष्यात आपण एखादी तरी तंत्रशुद्ध मराठी गझल लिहावी, असे त्यांना वाटते. हे गझलेचे यश नव्हे का? खरे तर मराठी गझलेने रसिकांवरच नव्हे तर मराठी कवींवरही आपले गारुड घातले आहे. गझल हा घाई गडबडीत आणि आततायीपणे लिहिण्याचा काव्य प्रकार नाही. गझल लिहिण्यासाठी आत्मस्फूर्ती, उर्मी, दूरदृष्टी आणि दृढता आवश्यक आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ गझलकार डॉ. शेख इक्बाल मिन्ने यांनी केले.

अंबाजोगाई येथे दि.७ एप्रिल रविवार रोजी नागपूरकर सभागृहात गझल मंथन साहित्य संस्थेतर्फे मराठवाडा विभागीय गझल संमेलन घेण्यात आले. या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. मिन्ने बोलत होते. या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक दगडूदादा लोमटे यांच्या हस्ते झाले. तर संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ गझलकार दास पाटील उपस्थित होते. ज्येष्ठ गझलकार डॉ .संतोष कुलकर्णी संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते.

यावेळी स्वागताध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी म्हणाले की, गझलेचे समुह आणि संस्थांच्या भाऊगर्दीत एकमेव टिकलेली व सातत्य ठेवणारी संस्था म्हणून गझल मंथन साहित्य संस्थेचा नावलौकिक आहे. गझल मंथन साहित्य संस्था गझलेचा सर्वांगाने




विकास करणारी संस्था आहे, असे गौरवोद्गार देखील डॉ. कुलकर्णी यांनी काढले. संमेलनाचे प्रमुख अतिथी दास पाटील म्हणाले की, गझलेच्या विकासासाठी गझल मंथन साहित्य संस्थेने प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. त्यासाठी त्यांचे सातत्यपूर्ण काम सुरू आहे. गझलेच्या तंत्रानंतर आता मंत्रावरही विचार व्हावा. संस्थेने यापुढील काळात चर्चासत्र, मुलाखती असे कार्यक्रम देखील घ्यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. गझलकार अनंत देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्था राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

नागापूरकर सभागृहात सायंकाळी उशिरापर्यंत रंगलेल्या या संमेलनातील मुशायऱ्यांचे अध्यक्षपद गझलकार रत्नाकर जोशी, डॉ. राज रणधीर, मुकुंद राजपंखे, शेखर गिरी, मारुती मानेमोड, आत्तम गेंदे यांनी भूषविले. तर सूत्रसंचालन गझलकार दिवाकर जोशी, आर. के. आठवले, चंद्रकांत कदम, आत्माराम जाधव, वंदना केंद्रे, अविनाश कासंडे यांनी केले.

या संमेलनात मराठवाड्यातील शेकडो नवोदित गझलकारांसह नामांकित गझलकार उपस्थित होते. सहभागी गझलकारांना आकर्षक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सूत्रसंचालन निशा चौसाळकर यांनी केले. तर आभार सजंय तिडके यांनी मानले. या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी गझल मंथन साहित्य संस्थेचे अध्यक्ष अनिल कांबळे, उपाध्यक्ष वसुदेव गुमटकर, सचिव जयवंत वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा कार्यकारिणी व मराठवाडा विभागीय कार्यकारिणीने परिश्रम घेतले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्‌ु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )